विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन व वेतनेत्तर अनुदानाच्या थकबाकीची रक्कम अदा करणे, पद मान्यता देणे, पद भरती करणे, समायोजन करणे व इतर दैनंदिन बाबींबाबत करावयाची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन शुद्धीपत्रक क्र. विभशा-२०१८/प्र.क्र.२८/ विजाभज-२

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक : ०३ मे, २०१८

वाचा:- शासन परिपत्रक क्र.विभशा-२०१८/प्र.क्र.२८/विजाभज-२, दि.२८ मार्च, २०१८

प्रस्तावना:-

विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन / उसतोड कामगारांच्या मुलांसाठीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन व वेतनेत्तर अनुदानाच्या थकबाकीची रक्कम अदा करणे, पद मान्यता देणे, पद भरती करणे, समायोजन करणे व इतर दैनंदिन बाबींबाबत करावयाच्या कार्यपध्दतीबाबत समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि.२८ मार्च, २०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदरहू शासन परिपत्रकामध्ये ज्या-ज्या ठिकाणी शासन परिपत्रक हा शब्द आलेला असेल त्या ऐवजी **"शासन निर्णय"** असे वाचावे. त्यामुळे आता त्या शासन निर्णयामधील परिच्छेद १ (१५) रद्द करण्यात येत असून त्याऐवजी सदर परिच्छेद १(१५) खालीलप्रमाणे वाचावा:-

१५) एखाद्या संस्थेतील विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेत नवीन भरती करण्यापूर्वी संबंधित संस्थेच्या आश्रमशाळांच्या कर्मचाऱ्यांच्या मान्य पदांची बिंदू नामावली संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मागासवर्ग कक्षाकडून तपासणी करून घ्यावी व त्यानंतर त्यांनी निर्धारीत करून दिल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या पद भरतीस अथवा पदास आरक्षणाच्या कायद्यातील धोरणानुसार मान्यता प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव संचालकांमार्फत प्रथमत: शासनास सादर करावा आणि शासन मान्यतेनंतर ते पद विहित पद्धतीद्वारे भरण्यासाठी संबंधित संस्थेस अनुमती द्यावी. तद्नंतर भरती केलेल्या पदांना वैयक्तीक मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी. परंतु, कोणत्याही परिस्थितीत संस्थेतर्फे परस्पर नियमबाह्यरित्या भरती करण्यात आलेल्या अथवा नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्याच्या पदाला परस्पर मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येउु नये. अशाप्रकारचे नियमबाह्य प्रस्ताव प्राप्त झाल्यास ते अमान्य करावेत.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०५१११६०३१५०१२२ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.05.11 16:03:45 +05'30'

(भा. र. गावित)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा.राज्यपालाचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहाय्यक.
६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे
७. विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव.
८. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व)
९. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (सर्व)
१०.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
११.मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा ....
१२.निवड नस्ती (विजाभज-२)